**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १३ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र विशेष पदयात्रांचं आयोजन.**
2. **विदर्भाच्या विकासाकरीता शासन वचनबद्ध असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं वर्ध्याच्या आर्वीत प्रतिपादन.**
3. **नागपूरातील राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी - एनएडीटी येथे आयआरएस अधिकाऱ्यांच्या 77व्या तुकडीच्या प्रशिक्षणाचा उद्या समारोप; केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी करणार संबोधित.**
4. **पुर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया वर्धा गडचिरोली तसेच अमरावती, जिल्ह्यांतील तुरळक ठिकाणी आज वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस पडण्याची शक्यता.**

**आंबेडकर जयंती**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या एक दिवस आधी राज्यासह देशभरात विविध ठिकाणी पदयात्रा काढली जात आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी आज बिहारमध्ये पटना इथं गांधी मैदानापासून सुरु होणाऱ्या पदयात्रेला हिरवा झेंडा दाखवला. आंबेडकर जयंतीनिमित्त युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आज मुंबईत भीम पदयात्रेत सहभागी झाल्या. नरिमन पॉइंट पासून मंत्रालयात आंबेडकर पुतळ्यापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. यावेळी पदयात्रेत हजारो संख्येनं तरुण सहभागी झाले. या पदयात्रेवेळी रक्षा खडसे यांनी या पदयात्रेमागील भूमिका स्पष्ट केली.

***जे आपले महापुरुष आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची उद्या जयंती आहे. त्यांच्या विचारांना घेऊन पुढे आपल्याला या देशाला विकसित बनवायचं आहे जयंती ही कोणत्याही महापुरुषाची फक्त एक दिवसापुरती साजरी न करता त्यांच्या विचारांना घेऊन आजचा युवा हा पुढे कसा जाऊ शकतो हा संदेश या पदयात्रेच्या माध्यमातून आम्ही सगळ्या देशभरातल्या युवकांना दिलेला आहे.***

नागपुरमध्ये दीक्षाभूमी परिसरात पंचशील ध्वजांची सजावट करण्यात आली आहे. अनुयायांसाठी मंडप, पाणी आणि स्वच्छतेची सोय आणि स्तूपावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर स्मृती संग्रहालय, शांतीवन चिचोली, कामठीतील ड्रॅगेन पॅलेस इथंही कार्यक्रमाच आयोजन करण्यात आलं आहे. आंबेडकर जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या पर्यटन संचालनालयानं येत्या १४ आणि १५ एप्रिलला मुंबई, नाशिक आणि नागपूर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीचं आयोजन केलं आहे.या टूर सर्कीटमध्ये नागपूरातील दिक्षाभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, कामठी इथल्या ड्रॅगन पॅलेस आणि नागलोक विहार या स्थळांचा यात समावेश आहे. आंबेडकर जयंतीनिमित्त उद्या नवी दिल्लीत संसद भवनात केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने आंबेडकर जयंतीचा उत्सव आयोजित केला आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, आणि इतर मान्यवरांच्या हस्ते सकाळी बाबासाहेब आंबेडकरांना पुष्पहार अर्पण करून उत्सवाची सुरुवात होईल. हा कार्यक्रम दुपारी १२ नंतर सर्वांसाठी खुला असेल.

## भारत संविधान अमृत महोत्सव

नागपुरातील दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्रच्या वतीनं, भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाप्रसंगी, "आपले संविधान, आपला स्वाभिमान" या उपक्रमाअंतर्गत आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त, "भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव" येत्या १४ आणि १५ एप्रिल दरम्यान केंद्राच्या परिसरात आयोजित करण्यात आला आहे. यात आयोजित प्रदर्शनात भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अद्वितीय योगदानाबद्दल माहिती देण्यात येईल. या प्रदर्शनाचं उद्घाटन सांस्कृतिक मंत्रालयाचे सहसचिव समर नंदा यांच्या हस्ते होईल. तसच डॉ.प्रदीप आगलावे यांचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या विषयावर "व्याख्यान" होणार असून कार्यक्रमाचा समारोप शाहीर ईश्वर पाटील आणि वृंद यांच्या पोवाडा गायनाने होईल. १५ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखन आणि भाषणांवर आधारित डॉ. विनोद इंदुरकर लिखित आणि दिग्दर्शीत "क्रांती विचार" हे महानाट्य सादर केले जाणार आहे.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचं आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## आर्वी विकासकामे

समृद्धी महामार्गामुळे देशव्यापी दळणवळण व्यवस्थेत विदर्भ केंद्रस्थानी आला असून तिथं औद्योगिक विकास करण्यासाठी शासन वचनबद्ध आहे अस प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केल. वर्धा जिल्ह्यात आर्वी

इथं विविध विकासकामांचं लोकार्पण आज फडणवीस यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी विदर्भात होणा-या गुंतवणूकीबाबत माहिती दिली.

***आपल्या या समृद्धी महामार्गामुळे जे नोड तयार झाले आहे, त्या नोडवर रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत आज आपण बघतो आहे कि, मोठ्या प्रमाणात इन्व्हेस्टमेंट आपल्या विदर्भात येते आहे. आता मी दावोसला असतांना जवळपास साडेसोळा लाख कोटी रुपयाची इन्व्हेस्टमेंट त्या ठिकाणी आली, त्यातली मला सांगतांना आनंद वाटतो कि जवळपास ७ लाख कोटी आपल्या विदर्भामध्ये आलेली आहे. आपण जर विरुळ सारख्या नोडवर त्याठिकाणी प्लग अँड प्ले अश्या प्रकारची MIDC उभी केली त्यातून मोठा फायदा होईल. मला विश्वास आहे कि, भविष्यात आपल्या वर्धा जिल्ह्याकरता हा जो काही इंडस्ट्रियल नोड तयार होईल, हा एक मोठं वरदान होईल आणि आपल्या जिल्ह्यातल्या तरुणाईच्या हाताला एक मोठं काम या माध्यमातून मिळेल हा विश्वास यानिमित्याने आपल्याला देतो.***

७२० कोटींच्या पायाभूत सुविधांच्या या कामामध्ये आर्वी नगरोत्थान योजनेअंतर्गत शहरातील विविध रस्ते विकास कामे, आर्वी अमृत योजनेअंतर्गत सांरगपूरी जलाशयाचे सौंदर्यीकरण, आर्वी उपजिल्हा रुग्णालय विस्तारीकरण बांधकाम, प्रशासकीय इमारत, आर्वी, गांधी विद्यालय विस्तारीत इमारत जलतरण तलाव व इमारत, आर्वी उपसा सिंचन योजना, धनोडी पंतप्रधान सूर्यघर मोफत योजना, सौरग्राम नेरी मिर्झापूर इथल्या कामाच लोकार्पण यांचा समावेश आहे. यावेळी भूजल पातळी खोल जात असल्यामुळे शेतकऱ्यांना १० अश्वशक्तीचे कृषीपंप वापण्याची परवानगी देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. राज्य शासनाने २०२५ ते २०३० पर्यंत राज्यातील वीज वापरकर्त्यांचे वीज बील दरवर्षी कमी करण्याचे नियोजन व तशी कार्यवाही सुरु केली आहे. तसेच ३०० युनीट पर्यंत वीज वापरणा-या मध्यम वर्गीय आणि गरीब कुटुंबांना सौर ऊर्जेअंतर्गत आणून मोफत वीज देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील ८० टक्के शेतक-यांना वर्षभर १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच येत्या पाच वर्षात राज्यात सामान्य नागरिकांचे वीज बील दरवर्षी कमी होणार, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**एनएडीटी**

नागपूर इथल्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी एनएडीटीमध्ये भारतीय महसूल सेवा -आयआरएस ७७ व्या तुकडीतील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचा प्रशिक्षणाचा समारोप केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या १४

एप्रिल रोजी सकाळी १० वाजता अकादमीच्या रंगशाला सभागृहात आयोजित करण्यात आलं आहे. याप्रसंगी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ सीबीडीटीचे सदस्य प्रबोध सेठ, प्रधान महासंचालक संजय बहादूर हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील. रॉयल भूतान सेवेच्या २ अधिकाऱ्यांसह ८४ अधिकारी प्रशिक्षणार्थींनी 16 महिन्यांचे सेवा पूर्वप्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. नागपूरच्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी (NADT) ही केंद्र शासनाच्या भारतीय महसूल सेवा अधिकाऱ्यांसाठीची (आयकर) सर्वोच्च प्रशिक्षण संस्था आहे. आयआरएस अधिकाऱ्यांची भरती केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) द्वारे आयोजित नागरी सेवा परीक्षा द्वारे केली जाते. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर, अधिकारी प्रशिक्षणार्थींना प्राप्तिकर सहाय्यक आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात येते.

## जनसंपर्क कार्यक्रम

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या आज झालेल्या जनसंपर्क कार्यक्रमात नागरिकांनी वैयक्तिक तसच प्रशासकीय अडचणींच्या संदर्भात निवेदने दिली. यात बुलढाण्याहून मतिमंद निवासी विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत मिळावी असे निवेदन काहींनी दिले. त्यावर गडकरी यांनी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना दूरध्वनीद्वारे केंद्र सरकारच्या अॅडीप योजनेतून दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या सूचना दिल्या. नागपुरातील अयोध्यानगर परिसरातील काही नागरिकांनी नाल्याचे पाणी वस्तीत शिरत असल्याचा मुद्दा निवेदनाद्वारे मांडला. यासंदर्भात गडकरी यांनी मनपा आयुक्तांना दूरध्वनी करून परिस्थितीची माहिती दिली आणि तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. यासोबतच रेल्वे, महामार्ग, कृषी, सहकार, पर्यावरण, पाणीपुरवठा, ऑटोमोबाईल अशा विविध क्षेत्र आणि विभागांशी संबंधित विषय गडकरी यांनी ऐकून घेतले.

## हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने पुढील काही तासात नागपूर, भंडारा, गोंदिया अमरावती, वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यांतील तुरळक ठिकाणी वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. दरम्यान आज सर्वात जास्त तापमानाची नोंद ही चंद्रपूर येथे 43 अंश सेल्सिअस करण्यात आली असून बुलढाणा वगळता विदर्भातील सर्व जिल्ह्याचे तापमान 40 अंश सेल्सिअसच्या वर आहे. दरम्यान गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर मका पिकाची लागवड केली होती. हे पीक कापणीसाठी सज्ज झाले असतानाच वादळी वाऱ्यांनी सुमारे

दोन एकर क्षेत्रातील मका पीक  जमिनीवर आडवे झाले आहे. या वादळामुळे शेतकऱ्यांचे जवळपास 25 ते 30 टक्के नुकसान झाले असून, शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत आणि नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून होत आहे.

## आयपीएल

इंडियन प्रिमियर लीग - आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं राजस्थान रॉयल्स विरुद्ध रॉयल चालेन्जर्स बंगळूरू यांच्या सुरु असलेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने बंगळूरू समोर १७३ धावांच लक्ष्य ठेवल असून विराट कोहली आणि फील सॉल्ट फलंदाजी करत असून शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा रॉयल चालेन्जर्स बंगळूरू संघाच्या 5 षटकात बिनबाद बाद 50 धावा झाल्या होत्या. दरम्यान, आजच्या दुसऱ्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्स आज संध्याकाळी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर मुंबई इंडियन्स विरुद्ध खेळतील. सामना ७:३० वाजता सुरू होईल.

## स्मार्टफोन आणि संगणक सवलत

अमेरिकेनं नव्यानं जाहीर केलेल्या करांमधून स्मार्टफोन आणि संगणक यांना सवलत देण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या जकात आणि सीमा सुरक्षा विभागानं दिलेल्या सुचनांनुसार, अमेरिकेत आयात होणाऱ्या या दोन्ही वस्तूंसाठी बहुतेक देशांसह चीनला देखील अतिरिक्त करातून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचा फायदा सेमीकंडक्टर, सोलर सेल आणि मेमरी कार्डसह इतर इलेक्ट्रॉनिक उपकरण आणि घटक यामध्ये होणार आहे.

*****